# लोकनेते राजारामबापू पाटील

प्रा. शामराव पाटील

स्वच्छ व निष्कलंक चारित्र्याचे नेते म्हणून मा. राजारामबापू पाटील यांचा संपूर्ण महाराष्ट्राला परिचय आहे.स्व. यशवंतराव चव्हाण यांचेपासून प्रेरणा घेऊन त्यांनी सुसंस्कृत विधायक वृत्तीने राजकारण केले. मा. बापूंचा मूळचा पिंडच मुळी विधायक व रचनात्मक कार्यकर्त्यांचा होता. त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडण १९२० ते १९४२ या तेजस्वी कालखंडात झाली. महात्मा ज्योतिबा फुले यांनी महाराष्ट्राच्या बहुजन समाजात सत्यशोधक समाजाद्वारे शिक्षण आणि ज्ञान रुजविण्याचा प्रयत्न केला होता. लोकमान्य टिळकांनी 'स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे' अशी गर्जना करुन, सर्व समाज खडबडून जागा केला. लोकमान्य टिळकांच्या निर्वाणानंतर महात्मा गांधी युगाची सुरवात झाली. स्वातंत्र्यासाठी सर्वसामान्य माणसाला त्यांनी सत्याग्रहाची हाक दिली. सर्व थरातील असंख्य लोक पक्ष–पंथ, भेद, धर्म विसरून स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित उध्दाराच्या चळवळीचा जोर धरला. सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात नव्या प्रबोधनाची लाट आली. महाराष्ट्रात पुरोगामी विचार मूळ धरू लागला.

या कालखंडात राजारामबापू पाटील यांच्या व्यक्तिमत्वावर एक निराळा प्रभाव पडला. समाजजीवनातील या सर्वच घडामोडीचा परिणाम त्यांच्या विचारावर आणि कार्यावर झालेला आपणास आढळून येतो. राजारामबापू पाटील यांनी आपल्या समाजकार्यास प्रथम आपल्या परिसरातून सुरवात केली. कासेगांव व परिसरातील वातावरण स्वातंत्र्य चळवळीत एका निराळ्या पध्दतीने तयार होत होते. वाळवे तालुक्यातील बहुजन समाजातील सर्व तरुणात नवजागृतीची लाट आली होती. शैक्षणिक संस्था आणि शाळा आकार घेत होत्या. या सुमारास राजारामबापू पाटील यांनी स्वातंत्र्य लढ्यातील ज्येष्ठ नेत्याकडून प्रेरणा घेऊन आपल्या तरुण सहकाऱ्यांना एकत्रित करून १९४५ मध्ये कासेगांव शिक्षण संस्थेची स्थापना केली. या संस्थेचे कासेगांव या त्यांच्या जन्मगावी आझाद विद्यालय सुरु केले. या शाळेत ते स्वतः इंग्रजी विषयाचे अध्यापन करु लागले. बहुजन समाज जर जागा करावयाचा असेल तर तो शिक्षणापासून वंचित राहता उपयोगी नाही. शिक्षणाची द्वारे समाजातील सर्व घटकांना खुली झाली पाहिजेत. अशी बापूंची धारणा होती. शिक्षणावर त्यांची नितांत श्रद्धा होती. म्हणून त्यांच्या सामाजिक कार्याची सुरुवात शिक्षणापासून झाल्याचे दिसून येते. आपल्या आयुष्याच्या प्रारंभीच्या काळातच बापूंनी आपल्या भावी जीवनाचा मार्ग नक्की केला आणि तो समाजकारणात हिरिरीने भाग घेऊ लागले. त्यांच्या समाजकार्यास एक निराळी धार आली. राजारामबापू पाटील यांनी उच्च शिक्षण बडोदा येथे सयाजीराव गायकवाड शिष्यवृत्ती घेऊन पूर्ण केले व कायद्याचे शिक्षण कोल्हापूर येथील साईक्स लॉ कॉलेजमधून घेतले. विद्यार्थी दशेत ब्रिटीश सरकार विरोधी चळवळीत भाग घेतला. परदेशी कपड्यावर बहिष्कार व होळी, हरिजनोध्दार आणि मंदिर प्रवेश, खादी व चरखा संघ, युवक सेवादल इत्यादि कार्यक्रमात सहभाग घेतला.

एक सुशिक्षित व धडपड करणारा तरुण म्हणून त्या वेळच्या स्वातंत्र्य सेनानींनी बापूंना सातारा जिल्हा स्कूल बोर्डाच्या निवडणूकीस उभे केले. स्कूल बोर्डात निवडून आल्यावर ते स्कूल बोर्डाचे चेअरमन झाले. या काळात त्यांनी जिल्ह्यातील प्रत्येक गावात शाळा व सक्तीच्या मोफत शिक्षणाची प्रभावीपणे अंमलबजावणी केली. स्कूल बोर्डात त्यांच्या शब्दाला वजन प्राप्त झाले. पुढे ते सांगली जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष झाले. सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यातील पेटलोंड पासून जत तालुक्यातील शेवटच्या टोकाच्या उमदी, संखपर्यंत प्रत्येक गांवात रस्ते, पिण्याच्या पाण्यासाठी बांधीव आड व शाळेसाठी इमारती बांधण्याचा त्यांनी संकल्प केला आणि अत्यंत सुसंघटितरित्या त्यांनी या सर्व विकास कामाचे नियोजन केले. ते कुशल संघटक असल्याने त्यांनी समाजातील सर्व

घटकातील लोकांना एकत्र केले. त्यांच्यात विश्वास निर्माण केला आणि संपूर्ण सांगली जिल्ह्यात कार्यकर्त्यांचे एक विलक्षण जाळे निर्माण केले. सर्व समाजात बापू या नावाभोवती निराळे वलय निर्माण झाले. लोकांच्याबरोबर बापूंची जवळीक निर्माण झाली. आणि खेड्यापाड्यातून बापूंना जिवाभावाचे कार्यकर्ते मिळू लागले.
संयुक्त महाराष्ट्राचे आदोलन जोमात असताना राजारामबापू पाटील हे मा. यशवंतराव चव्हाण यांच्या मागे ठामपणे उभे राहिले. १९५७ सालच्या विधानसभेच्या निवडणूकीत त्यांना पराभव पत्करावा लागला. पण बापूंनी आपली जिद्द सोडली नाही. ते अधिक जोमाने लोकांची कामे करु लागले. त्यांच्यातील कार्य करण्याची जिद्द मा. यशवंतराव चव्हाण यांनी अचूक हेरली आणि त्यांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाचे अध्यक्षपद दिले. बापूंच्याकडे संघटन कौशल्य असल्याने त्यांची महाराष्ट्राला नव्याने ओळख झाली आणि येथून पुढे मा. बापूंच्या कर्तृत्वास धुमारे फुटू लागले. स्व. यशवंतराव चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश आणला आणि कृषि औद्योगिक क्रांतीची तुतारी महाराष्ट्रात घुमू लागली. १९६२ च्या विधानसभेच्या निवडणूकीत मा. बापू प्रचंड मताधिक्याने विजयी झाले. आणि मा. वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात त्यांचा समावेश झाला. मंत्री म्हणून मा. बापूंनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा निर्माण केला. त्यांच्या कर्तृत्वास बहर आला. असंख्य लोक त्यांच्याजवळ आपली कामे घेऊन येत असत. यातून बापूंचा लोकसंग्रह अधिक विस्तृत झाला. निरनिराळ्या क्षेत्रातील कार्यकर्ते अचूक हेरून त्यांना काम करण्यास प्रोत्साहन देण्याचे काम बापू करत. कृषि औद्योगिक क्रांतीची कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी बापूंनी सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक आणि सहकार क्षेत्रात अनेक संस्था निर्माण करण्यास प्रेरणा दिली.

मा. राजारामबापू पाटील यांचा लोकसंपर्क थेट लोकांच्याबरोबर होता. सर्वसामान्य गरीब लोकांच्या असंख्य अडचणी त्यांना जाणवत होत्या. त्या निवारण करण्यासाठी ते अहोरात्र झटत असत. सर्वसामान्य गरीब माणसांच्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनासाठी सहकाराशिवाय अन्य पर्याय नाही याची त्यांना खात्री पटली आणि म्हणूनच त्यांनी सांगली जिल्ह्यात विविध ठिकाणी निरनिराळ्या सहकारी संस्था निर्माण केल्या. परिवर्तनाच्या कार्यात स्वतःला झोकून देवून काम करणारे कार्यकर्ते बापूंनी घडविले. कार्यकर्ता अचूक निवडावयाचा, त्याला प्रेम द्यावयाचे, काम करीत असताना त्यांच्या मागे उभे राहावयाचे, अडचणीवर मात करण्याची जिद्द त्यांच्यात निर्माण करावयाची, त्यांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करावयाचा ही मा. बापूंची कार्यपद्धती होती.

राजारामबापू पाटील हे १९६२ ते १९७२ या काळात महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात होते. त्यांच्याकडे महसूल, उद्योग वीज, सहकार, नागरी पुरवठा, इत्यादी महत्वाची खाती होती. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात असताना त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेऊन महाराष्ट्रांच्या विकासाला हातभार लावला. ते महसूल मंत्री असताना शेतकऱ्यांना उपयुक्त अशी खाते पुस्तिका योजना सुरु केली. एका दृष्टीने ही योजना शेतकऱ्यांच्या जीवनातील क्रांतिकारक घटना होय. शेतकऱ्यांच्या जमीनीची अद्ययावत नोंद करून ती खाते पुस्तिका शेतकऱ्यांना देण्याची योजना होती. या योजनेचे विधानसभा व विधानपरिषदेत सर्व पक्षाच्या आमदारांनी अंतःकरण पूर्वक स्वागत केले.

मा. बापू उद्योग मंत्री असताना कारखानदार, उद्योगपती, व्यापारी यांच्यात नवा विश्वास निर्माण केला. त्यांना औद्योगिक वाढीसाठी आवश्यक त्या सुविद्या दिल्या. त्यामुळे महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती मोठ्या प्रमाणात झाली. कारखानदाराना व उद्योगपतींना पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक या भागात आवश्यक ते सहकार्य देऊन या भागाची औद्योगिक वाढ करण्याचे महत्वाचे कार्य केले. याच काळात त्यांनी महाराष्ट्राची कारखानदारी पुणे– मुंबईच्या बाहेर मागासलेल्या भागात जावी म्हणून विशेष प्रयत्न केले. प्रत्येक जिल्ह्याच्या प्रमुख ठिकाणी व तालुका स्तरावर औद्योगिक वसाहती स्थापन करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले. महाराष्ट्राचा समतोल आर्थिक विकास व्हावा हीच त्यांची यामागे मुख्य भुमिका होती. १९७२ साली झालेल्या विधानसभेच्या निवडणूकीत मा. बापू विक्रमी मतांनी

निवडून आले. मात्र त्यांचा महाराष्ट्रचा मंत्रिमंडळात समावेश झाला नाही. महाराष्ट्रातील असंख्य कार्यकर्त्यांनी व राजकीय समीक्षकांना याचे आश्चर्य वाटले व खेदही झाला. मंत्रिपदावरून दूर झाल्यामुळे मा. बापू खचले नाहीत की उमेद हरले नाहीत. त्यांनी ठरविले की एक आमदार म्हणून विधानसभेत जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडावयाची योग्य व सदनशीर मार्गांनी जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करावयाची मंत्रिपदावरून पायउतार झाल्यानंतरचे एक आमदार म्हणून मा. बापूंचे वेगळे स्वरूप दिसू लागले. अत्यंत शांत, संयमी, विनयशील, लोभस असलेचे व्यक्तिमत्व आता करारी, परखड विचार मांडणारे, जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रसंगी आक्रमक भूमिका घेणारे बापूंचे स्वरूप लोकांना दिसू लागले. वृत्तपत्रांनी बापूंच्या या नव्या स्वरुपाबद्दल कौतुकाचे शब्दलेखन केले.

मा. बापूंनी ज्या वाळवा तालुक्याचे प्रदीर्घकाळ प्रतिनिधित्व केले त्या तालुक्याचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून अथक प्रयत्न केले. तालुक्यातील सर्व गावामध्ये, वाड्या वस्तीवर प्राथमिक शाळा, पिण्याची सोय, रस्ते इत्यादी सुविधा केल्या. तालुक्यातील प्रत्येक माणसाची सुखदुःखे जाणून घेऊन त्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला. वाळवे तालुक्यातील इंच न इंच जमीन पाण्याखाली यावी, येथील सर्व शेती बागायती व्हावी व संपन्नता यावी असे स्वप्न मा. बापूंनी उराशी बाळगले होते. त्यासाठी त्यांनी खुजगांव धरणाचा आग्रह धरला. त्यासाठी तीव्र आंदोलन केले. त्यातून वारणा धरणाची निर्मिती झाली.

१९७२ ते १९७७ या काळात एक जागरूक आमदार म्हणून मा. बापूंनी आपल्या व्यक्तिमत्वाचा वेगळा ठसा निर्माण केला. त्यासाठी त्यांना प्रचंड संघर्ष करावा लागला. त्यांना खूप त्रास व यातना सहन कराव्या लागल्या. काँग्रेसपक्षात राहून आपल्याला मनासारखे सार्वजनिक कार्य करता येणार नाही, अशी खात्री पटल्यामुळेच त्यांनी काँग्रेस पक्ष सोडून केंद्रीय मंत्री असलेल्या जगजीवनरामबापू यांनी स्थापन केलेल्या लोकशाही काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मा. बापू या पक्षाचे राज्याचे अध्यक्ष झाले. पण लवकरच जगजीवनरामबाबूंनी आपला लोकशाही काँग्रेस पक्ष जनता पक्षात विलीन केला. त्यामुळे मा. बापूंना जनता पक्षात जाण्याशिवाय पर्याय राहिला नाही. पुढे काही काळानंतर ते जनता पक्षाचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष झाले. या पक्षाची संघटना मजबूत करण्यासाठी त्यांनी संपूर्ण राज्याचा दौरा केला. उभा महाराष्ट्र जनतामय करून दाखविला.

महाराष्ट्राच्या राजकारणीतील एक अतिशय सुसंस्कृत व्यक्तिमत्व म्हणून राजारामबापू पाटील यांचा उल्लेख करावा लागेल. मा. यशवंतराव चव्हाण यांची भारताच्या राजकाराणात जी प्रतिमा होती तीच प्रतिमा मा. राजारामबापू पाटील यांची महाराष्ट्राच्या राजकारणात होती. मा. बापूंनी आपल्या हातातील सत्ता अतिशय नम्रपणे हाताळली. त्यांनी आपल्या शालीन, सुसंस्कृत व्यक्तिमत्वाचे महाराष्ट्रातील उगवत्या पिढीसमोर नवा वस्तुपाठ उभा केला. त्यांचे जीवनकार्य महाराष्ट्रातील शेकडो कार्यकर्त्यांना मार्गदर्शक ठरेल.